Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# महिलांचा सत्ता सहभाग : एक दृष्टिक्षेप

**प्रा. नितीन मुकुंदराव नन्नावरे,** बी. पी. आर्ट्स, एस. एम. ए. सायन्स अँड के. के. सी. कॉमर्स महाविद्यालय, चाळीसगांव
**प्रा. डॉ. विजय एस. तुंटे,** विभाग प्रमुख, प्रताप महाविद्यालय, अमळनेर

**गोषवारा**

जगाच्या एकूण लोकसंख्येच्या ४९.५ टक्के महिला असल्या तरी,जगातील सर्वात उपेक्षित वर्गही त्या आहेत. संस्थात्मक दबावाचा अभाव आणि राष्ट्रीय आणि राज्य-स्तरीय राजकारणात महिला नेत्यांच्या लक्षणीय वर्गाची वाढ सुलभ करण्यासाठी राजकीय पक्षांची असमर्थता ही भारतातील लिंग-समावेशक राजकारणासाठी चिंतेची बाब आहे. स्थानिक पातळीवरील राजकारणात सकारात्मक बदल होऊनही, राजकारणातील उच्च पदांवर महिलांना पुरेशा प्रतिनिधित्वाशिवाय, सर्वांगीण महिला सक्षमीकरणाच्या मुद्द्यांचा नीती-नियोजन आणि शासनप्रणालीत पद्धतशीर समावेश करणे कठीण आहे. अधिक समान समाज निर्माण करण्याच्या उद्देशाने आधुनिक दृष्टिकोन आणि उदारमतवादी मूल्यांच्या आगमनाने, सामाजिक-आर्थिक तसेच राजकीय क्षेत्रात महिलांच्या अधिकारांचे एकत्रीकरण दिसून येत असले तरी वास्तव मात्र चिंतन करण्यास प्रवृत्त करते.संशोधकाने महिलांचा सत्ता सहभाग : एक दृष्टिक्षेप या शोधनिबंधात समीक्षात्मक भूमिका मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**मुख्य शब्द -** महिला,राजकारण,उपेक्षित,असमर्थता,सकारात्मक,सक्षमीकरण

**प्रस्तावना**

भारतीय स्त्रियांनी वेगवेगळया क्षेत्रात आपले कर्तुत्व सिद्ध केले असले तरी राजकारण हा त्यांचा प्रांत नाही,हे पुरुषांनीच ठरवले आहे. त्यामुळे या क्षेत्राचा चेहरामोहरा पुरुषप्रधानच राहिला आहे.निवडणुकीच्या संदर्भात कुरुक्षेत्र,रणांगण हे शब्द पुरुषप्रधानतेचीच मिथके. या क्षेत्रातील निर्णयप्रक्रियेत स्त्रियांचे प्रमाण दहा टक्के देखील नाही ,कारण राजकारण हा सत्तेचा खेळ,सत्ता मिळवायची,ती राबवायची आणि त्यातून आणखी सत्तावान होत जायचे ही महत्वाकांक्षा बाळगणाऱ्यांचे हे क्षेत्र,या पद्धतीच्या राजकीय सत्तेची अपेक्षा असणाऱ्या स्त्रीवर आपल्याकडे सरसकट अतिमहत्वाकांशी असा शिक्का मारला जातो आणि तिने अशा आकांक्षा बाळगणे कसे चुकीचे आहे,हेच तिला सतत सांगितले जाते. राजकारणासाठी द्यावा लागणारा वेळ पाहता एखादा अपवाद वगळता घरात राजकीय पार्श्वभूमी असलेल्या स्त्रियाच राजकारणात सक्रिय दिसतात. काही स्त्रिया देशाच्या (राष्ट्रपती,पंतप्रधान,मुख्यमंत्री) सर्वोच्च पदी पोहचल्या म्हणून स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढला असे नाही. अपवाद वगळता इतर स्त्रियांसाठी ती वाट बिकटच आहे.लोकसंख्येतील स्त्रियांचे नैसर्गिक प्रमाण ५० टक्के म्हणजेच पुरुषांच्या इतके,पण त्यांचा राजकारणातला सहभाग दहा टक्के देखील नाही,ही परिस्थिति सुधारण्यासाठी आरक्षण हाच उपाय असू शकतो. आरक्षण ही कोणत्याही वंचित घटकांची स्वाभाविक मागणी असणार. म्हणूनच स्वातंत्र्यपूर्व काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकर पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य समाजासाठी राखीव जागांची मागणी करत असताना दुसरीकडे नव्याने उभारी घेत असलेली स्त्रियांची चळवळसुद्धा स्त्रियांना राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी प्रांतिक निवडणुकीत राखीव जागांचा मुद्दा उपस्थित करत होती.स्वतंत्र भारताच्या


Copyright © | JET Network, All Rights Reserved

राज्यघटनेने स्त्रियांना प्रौढ मतदानाचा समान अधिकार आणि सर्व क्षेत्रात भेदभावापासून समान संरक्षण दिल्यानंतर सुरवातीच्या काळात तो काहीसा मागे पडला,परंतु १९७४ च्या स्त्रियांची स्थिति दर्शविणाऱ्या "Towards Equality" या अहवालात राजकारणात सर्व टप्प्यांवर स्त्रियांची संख्या नगण्य आहे हे नोंदवले गेले.

**संशोधन पद्धत**

प्रस्तुत लघुशोध संशोधनासाठी दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे. त्यात प्रकाशित, अप्रकाशित ग्रंथ, पुस्तके, मासिके, वृत्तपत्रे, इंटरनेट इत्यादींचा उपयोग करण्यात आला आहे. संकलित माहितीच्या आधारे लघुशोध निबंधाची मांडणी करण्यात आली आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. भारतात महिलांच्या मतटक्क्यात कशीकशी वाढ होत गेली?
२. संसदेत महिलांचे प्रतिनिधित्व किती वाढले?
३. अभ्यासकांची निरीक्षणे काय सांगतात?
४. इतर देशांशी तुलना केल्यास राजकारणातील महिलांच्या सहभागाची भारतातील परिस्थिती काय सांगते?
५. वर्तमान काळातील स्त्रियांचा राजकीय दर्जाचा अभ्यास करणे.

**सक्षमीकरणाचे वास्तव**

जगभरात स्त्री पुरुष समानता येण्यासाठी शेकडो वर्षांपासून कार्य केलं जात आहे. मात्र, अजुनही जगात स्त्रियांना समान स्थान का मिळत नाही हा प्रश्न उरतोच.भारत आर्थिक-राजकीय प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत असताना, आजही देशात लैंगिक विषमतेची परिस्थिती गंभीर आहे. ग्लोबल जेंडर गॅप इंडेक्सने जागतिक पातळीवरही लैंगिक विषमता समाप्त होण्यासाठी शेकडो वर्षांचा अंदाज वर्तविला आहे.या परिस्थितीच्या संदर्भात अमेरिकन राजकारणी हेलिरी क्लिंटन म्हणाल्या की "Women are the most untapped store in the world". जागतिक आर्थिक मंचाने म्हटले आहे की, जगात लैंगिक समानता आणण्यासाठी 2019 पासून 99.5 वर्षे लागतील. 2018 मधील क्रमवारीनुसार 108 वर्षे लागतील. याचा अर्थ महिला व पुरूष यांच्यात आरोग्य, शिक्षण, काम, राजकारण यात खूप दरी आहे. (Global gender gap Index - 2020) मध्ये शिक्षणातील लैंगिक समानतेत भारत 112 व्या क्रमांकावर आहे.भारताने महिलांच्या राजकीय सक्षमीकरणात 18 वा क्रमांक पटकावला असला तरी आरोग्यात 150 वा तर महिलांच्या आर्थिक सहभागात 149 वा क्रमांक लागला आहे. जगातल्या केवळ २४ देशांचे प्रमुखपद महिलांकडे आहे. जगभरातील महिला मंत्र्यांची संख्या २१ टक्के आहे. फक्त १४ देशांतील मंत्रिमंडळांत पन्नास टक्के महिलांचा सहभाग आहे. याच गतीनं प्रगती सुरू राहिली तर सत्तेतील महिलांच्या अर्ध्या सहभागासाठी १३० वर्षं लागतील...' हे कुण्या राजकीय विचारवंताचं निरीक्षण नाही. हे संयुक्त राष्ट्रांच्या दोन वर्षांपूर्वीच्या अहवालातील भाष्य आहे. याबाबत चिंतन होणं गरजेचं आहे.

**अभ्यासकांची निरीक्षणे**

महिलांच्या राजकीय सहभागाबाबत विदेशात भरपूर संशोधनं झाली. भारतातही झाली. अनेक अहवाल प्रसिद्ध झाले. " Towards Equality" या अहवालात फुलरेणू गुहा यांनी राजकारणातील महिला सहभागाचा आढावा घेऊन, राजकीय आरक्षणाची मागणी केली होती. 'नॅशनल पर्स्पेक्टिव्ह प्लॅन फॉर विमेन


Copyright © | JET Network, All Rights Reserved

(१९८८ ते २०००)' मध्ये महिलांच्या राजकीय सहभागाचा संपूर्ण लेखाजोखा मांडला आहे. आरक्षणाची शिफारस केली आहे. सुमा चिटणीस यांनी तर ही विषमता भयंकर असल्याचं म्हटलं आहे. घटनादत्त समानता आणि प्रत्यक्षातील सत्ता या दरीचं वर्णन रगी छाब्रा आणि अल्का बसू यांनी केलं आहे. वीणा मुजुमदार यांनी महिलांच्या पदांवर भाष्य केलं आहे. इंदिरा अवस्थी यांनी महिलांचे राजकीय निर्णय कसे होतात, यावर भाष्य केलं आहे. महाराष्ट्रात चंद्रकला हाटे, उषा बंबवाले, व्ही. एम. सिरसीकर यांनी आपली निरीक्षणं नोंदविली आहेत. 'स्त्रीशक्तीचे राजकारणी रूप' यात रोहिणी गवाणकर यांनी राजकारणातील महिलांच्या उच्चवर्णीय असण्यावर बोट ठेवलं आहे. 'महिलांचा सत्तासहभाग' यातून मेघा नानिवडेकर यांनी महिलांचे स्थानिक स्वराज्य संस्थेतील सत्ताकारण स्पष्ट केलं आहे. या लेखात लोकसभेतील महिलांचं प्रतिनिधित्व, मतदार, मतदान यावर प्रकाश टाकून त्यातील बारकावे स्पष्ट केले आहेत. इतर देशांची तुलना केली आहे. महिलांची ही स्थिती कधीपासून आहे, हे बघण्यासाठी इतिहासात डोकावण्याची गरज भासते.

**ऐतिहासिक नोंदी**

भारत एकसंध देश होण्याआधी विविध राज्यांमध्ये विभागलेला होता. वेगवेगळे राजे राज्य करीत असत. त्यांच्या काळात महिलांचं स्थान महत्त्वाचं होतं. अभ्यासक मोहिनी कडू यांच्या मते, 'ऋग्वेदातील मंत्रांमध्ये स्त्रियांचं राजकारणातील स्थान दिसतं. अपाला, लोपामुद्रासारख्या स्त्रियांनीही वेदांच्या निर्मितीस हातभार लावला.वैदिक काळाच्या उत्तरार्धात स्त्रियांच्या शिक्षणाचे दाखले मिळतात.' रामायणात सीतेचं स्थान महत्त्वपूर्ण आहे. महाभारत कुंती, द्रौपदीच्या भोवती फिरतं. सम्राट अशोकाची मुलगी धर्मप्रचारासाठी विदेशात गेलेली दिसते. चंद्रगुप्ताची मुलगी प्रभावती एका भागाची प्रमुख झालेली दिसते. चालुक्य वंशातील राजकुमारी विजय भट्टारिका राजकारणात सक्रिय असलेली दिसते.

मुस्लिम राजवटीत रझिया सुलतानची कारकीर्द इतिहासानं नोंदविलेली आहे. चांदबिबी, राणी दुर्गावती, छत्रपती शिवरायांच्या मातोश्री जिजाऊ भोसले, औरंगजेबाच्या दरबारातील एक हिंदू सेनापती म्हणून पुढे आलेली सावित्रीबाई उदाराम ज्यांना औरंगजेबानं रायबागण हा किताब दिला होता. मोगलांना जेरीस आणणारी छत्रपती राजाराम यांची पत्नी ताराराणी, १८५७ च्या युद्धात ब्रिटिशांना सळो की पळो करणारी झाशीची राणी यासारख्या कर्तबगार महिलांच्या नोंदी इतिहासाच्या पानापानांवर नोंदविलेल्या आहेत. यावरून राजकारणात महिला कुठंही मागे नव्हत्या, असं दिसतं.

**लोकशाही आणि महिला मताधिकार**

ब्रिटिशांच्या राजवटीत अनेक गोष्टी बदलल्या. जागतिक पातळीवरही ते बदल दिसू लागले. लोकशाहीचे वारे वाहू लागले. मतांनी सत्ता बदलू लागल्या. मग महिलांना मतदानाचा हक्क मिळावा म्हणून चळवळी सुरू झाल्या. १८९३ मध्ये न्यूझीलंडनं महिलांना मतदानाचा हक्क दिला. १९०७ मध्ये फिनलंडनं, १९१३ मध्ये नॉर्वेनं, १९१५ मध्ये डेन्मार्कनं, १९२० मध्ये अमेरिकेनं, तर १९४४ मध्ये फ्रान्सनं महिलांना मतदानाचा हक्क दिला. भारतात लोकशाहीचे वारे मॉन्टेग्यू अहवालानंतर आले. १९१९ नंतर भारतीयांना आपले प्रतिनिधी निवडण्याचा हक्क मिळाला; पण तो फक्त ठरावीक लोकांनाच. महिलांचा त्यात समावेश नव्हता.१९२१ नंतर मुंबई आणि मद्रास पहिले प्रांत ठरले जिथं महिलांना मतदानाचा अधिकार देण्यात आला. नंतर १९२३ ते १९३० च्या दरम्यान इतर सात प्रांतांमध्ये महिलांना मतदानाचा अधिकार देण्यात आला. महिलांचं नाव मतदारयादीत समाविष्ट करण्यासंबंधी वेगवेगळ्या प्रातांनी वेगळेवेगळे नियम बनवले. १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.१९५० मध्ये भारताला स्वत:ची राज्यघटना मिळाली, तोपर्यंत


Copyright © | JET Network, All Rights Reserved

सर्वांना मतदानाचा अधिकार आणि निवडणुकीतून लोकशाहीचा विचार पक्का झाला होता,' असं शनी यांनी लिहिलं आहे. १९४८ मध्ये जेव्हा मतदारयादीचा मसुदा तयार करण्याची वेळ आली, तेव्हा त्या वेळी अनेक समस्यांना सामोरं जावं लागलं.महिलांची नावं लिहिताना अडचणी येत होत्या. अनेक महिलांनी स्वत:चं नाव सांगण्यास नकार दिला.ती परिस्थिती ते आजची परिस्थिती, यात खूप बदल झालेला आहे. आज महिला पुरुषांच्या बरोबरीनं मतदानाचा हक्क बजावत आहेत. परंतु त्यांना अद्याप योग्य प्रतिनिधित्व प्राप्त झालेलं नाही.

**मतटक्क्यातील वाढ आणि प्रतिनिधित्व**

लोकांनी,लोकांसाठी चालविलेला राज्यकारभार म्हणजे लोकशाही, अशी लोकशाहीची व्याख्या केली जाते. लोक या परिभाषेत पुरुष आणि महिला या दोघांचाही समावेश होतो. २०११ च्या जनगणनेनुसार, भारतात पुरुषांची संख्या ६२ कोटी (५१.५४ टक्के), तर महिलांची संख्या ५८ कोटी (४८.४६ टक्के) इतकी आहे. महिलांची संख्या जवळपास पुरुषांच्या बरोबरीनेच आहे, मग राज्यकारभारात त्यांचा वाटा तेवढाच आहे का? २०१९ मध्ये झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत पुरुष मतदारांची संख्या होती ४७ कोटी ३३ लाख, त्यापैकी ३१ कोटी ७२ लाख पुरुषांनी मतदानाचा हक्क बजावला. महिला मतदारांची संख्या होती ४३ कोटी ८५ लाख, ज्यापैकी २९ कोटी ४६ लाख महिलांनी मतदानाचा हक्क बजावला. मतदानात पुरुषांची संख्या केवळ ०.४ टक्क्यानं अधिक आहे. मतदानात बरोबरीनं सहभागी होणाऱ्या महिलांना लोकशाहीत स्थान किती असावं? लोकसभेतील ५४३ सदस्यांपैकी महिलांची संख्या आहे फक्त ७८, म्हणजेच १४ टक्के. महिलांचे नेतृत्वातील प्रमाण पाहता भारत 136 व्या क्रमांकावर असून हे प्रमाण 14 टक्के आहे तर राजकीय सक्षमीकरणात भारत 122 व्या क्रमांकावर आहे. कारण संसदेत 14.4 टक्के महिला आहेत. मंत्रिमंडळातील समावेशात भारत 69 व्या क्रमांकावर असून महिलांचे प्रमाण 23 टक्के आहे.महिला ज्या प्रमाणात मतदार बनल्या, मतदानात सहभागी झाल्या, त्या प्रमाणात त्यांना राजकीय प्रतिनिधित्व मिळालं नाही. ही परिस्थिती पूर्वापार चालत आलेली आहे.

**संसदेत प्रतिनिधित्व कमीच**

१९५२ मध्ये झालेल्या देशाच्या पहिल्या निवडणुकीत २२ महिला निवडून आल्या होत्या. प्रमाण होतं ४ टक्के. चारचे १४ टक्के होण्यासाठी ७० वर्षं लागली. हा प्रवास पाहता, संयुक्त राष्ट्रांचा अहवाल डोळ्यांत अंजन घालणारा वाटतो. २०१७ मध्ये संयुक्त राष्ट्रांनी संसदेतील महिलांच्या सहभागाची एक पाहणी केली होती, त्यात १९० देशांमध्ये भारताचा क्रमांक १४८ वा होता. ही बाब नक्कीच चिंता करण्यासारखी आहे. भारतातील राजकारण, त्यात महिलांचा सहभाग हा दुर्लक्षित राहिलेला विषय आहे. महिलांना मतदानाचा हक्क मिळण्यापासून संसदेत त्यांचा प्रवेश होईपर्यंतचा संघर्ष मोठा आहे.

**पुरुषसत्ताक राजकारण व महिला**

समाजातील सत्तेचे वाटप करण्याची प्रक्रिया म्हणजे राजकारण.त्यामुळे सामाजिक परिवर्तन आणि राजकारण या परस्परविरोधी गोष्टी नाहीत याचे भान चळवळीतील स्त्रियांना आणून देणं खूप गरजेचं होतं. त्यात स्त्री चळवळ कमी पडली. राजकारणात सत्ताकरणाची प्रक्रिया असते त्यामुळे समाजातील परस्परविरोधी दृष्ट शक्ती व प्रवृत्ती सर्व ताकतीनिशी राजकारणाच्या आखाड्यात उतरतात. त्यामुळे राजकारण अतिशय गतिशील, धकाधकीचं आणि संवेदनशीलही असतं.प्रस्थापित राजकारणात सक्रिय होण्यासाठी भक्कम आर्थिक पाठबळ, संसाधनांवर ताबा, ज्ञानावर-माहितीवर अधिकार असावा


Copyright © | JET Network, All Rights Reserved

लागतो.स्त्रियांकडे आजमितीला या गोष्टी नसल्यामुळे राजकीय सत्तेतील स्त्रियांचा सहभाग अत्यल्प आहे. स्त्री चळवळीमुळे झालेल्या स्त्रियांच्या जागृतीचं राजकीयीकरण केलं गेलं आहे, स्वपक्षातील क्रांतिकारी नेतृत्वही स्वपक्षातील महिलांना वाव देत नाही तसेच धर्म, राजकारण आणि गुन्हेगारीचं साटं-लोटं आहे. प्रस्थापित राजकीय पक्ष पुरुषांचे,पुरुषांसाठी,पुरुषांनी निर्माण केलेली असल्यामुळे स्त्रियांना सुरक्षिततेच्या कोंदनात बसवून त्यांच्या कर्तुत्वाच्या,विकासाच्या संधी नाकारण्याचं पुरुषी राजकारण ते पक्ष करत आहेत.

**लोकशाही आणि महिला सक्षमीकरण**

विविध लोकशाही कार्यालये आणि आंतरराष्ट्रीय संस्थांद्वारे राजकारणात आणि सार्वजनिक जीवनाच्या इतर क्षेत्रांमध्ये महिलांचा अधिकाधिक सहभाग सुलभ करण्यासाठी विविध परंतु बहुआयामी,जागतिक प्रयत्न असूनही, परिणाम संथगतीने आणि संरचनात्मक आणि मानसिक आव्हानांनी भरलेले आहे. अलीकडच्या काही दशकांत माफक सुधारणा होऊनही जगभरातील राजकारणातील महिलांचा सहभाग व प्रतिनिधित्व प्रमाणानुसार कमी राहिले आहे. मात्र हे चित्र आता बदलण्याची गरज आहे.जग आंतरराष्ट्रीय लोकशाही दिन साजरा करत असताना, केवळ लोकशाहीच्या संस्था आणि प्रक्रियांमध्येच नव्हे तर लोकशाही राजकारणाच्या प्रत्येक प्रवचनातही स्त्रियांच्या अधिकाधिक प्रतिनिधित्वाची गरज आहे. हुकूमशाहीच्या विपरीत, लोकशाहीला मूलतः एक सशक्त आणि सुधारक राजकीय प्रकल्प म्हणून ओळखले जाते. जे सामान्य नागरिकांना त्यांची ओळख, स्वारस्ये, निवडी, विचार आणि मागण्यांचे शासन आणि सरकारी धोरणांच्या संस्थांमध्ये प्रतिनिधित्व सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक साधन आणि मार्ग देते. समतुल्य राजकीय प्रतिनिधित्वाची इच्छा ही आधुनिक लोकशाहीतील विविध वर्गातील लोकांची प्रमुख आकांक्षा आहे. हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की राजकीय प्रतिनिधित्वाचे अत्यंत कार्यात्मक महत्त्व आहे कारण ते एखाद्या व्यक्तीच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक सशक्तीकरणासाठी मार्ग मोकळा करू शकते, जे सन्मानाचे जीवन जगण्यासाठी अपरिहार्य आहेत. म्हणून, लोकशाही प्रणाली देऊ पाहत असलेले समान प्रतिनिधित्वाचे वचन विशेषतः समाजातील उपेक्षित आणि शोषित घटकांच्या सामाजिक-राजकीय सक्षमीकरण आणि उन्नतीसाठी महत्त्वपूर्ण आहे.

**भारतीय लोकशाहीत लैंगिक समानता**

भारत ही सर्वात मोठी आणि सशक्त लोकशाही आहे. ज्याने घटनात्मक लोकशाही म्हणून वसाहतीनंतरच्यास्वतंत्र अस्तित्वाच्या प्रारंभापासूनच स्त्रि आणि पुरुष दोघाना समान राजकीय व नागरी हक्क प्रदान केले आहेत. कलम 325 आणि 326 मध्ये दिलेल्या मतदानाच्या आणि निवडणूक लढविण्याच्या राजकीय अधिकाराव्यतिरिक्त, भारतीय राज्यघटनेचा भाग III पुरुष आणि महिलांच्या मूलभूत अधिकारांची हमी देतो.भारतातील राजकारणातील महिलांचा सहभाग काळाच्या ओघात निःसंशयपणे वाढला आहे. मतदार म्हणून निवडणुकांमध्ये सहभाग घेण्याच्या दृष्टीने, महिलांच्या मतदानात गेल्या काही वर्षांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे आणि 2019 मधील गेल्या राष्ट्रीय निवडणुकांमध्ये पुरुषांच्या तुलनेत महिलांनी जवळपास तितक्याच संख्येने मतदान केले – ही 'स्व-सक्षमीकरणाची महिलांची मूक क्रांती' म्हणून गौरवण्यात आली. महिलांच्या अशा वाढलेल्या राजकीय सहभागाचे श्रेय साक्षरतेचे प्रमाण वाढले आहे आणि डिजिटल आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे माहितीच्या प्रसारामुळे मोठ्या प्रमाणात राजकीय जागरूकता आली आहे.तथापि, लोकसभा आणि राज्यसभेतील महिलांच्या प्रतिनिधीत्वाची आकडेवारी असे सूचित करते की निवडणुकीत महिला मतदारांचा सहभाग मोठ्या प्रमाणात वाढला आहे. मात्र संसदेत


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

महिला प्रतिनिधींचे प्रमाण खूपच कमी राहिले आहे. ज्या देशात महिलांची लोकसंख्या तिच्या लोकसंख्येच्या निम्मी आहे, राष्ट्रीय आणि राज्य विधानमंडळांमध्ये केवळ 10-14 टक्के महिला प्रतिनिधी भारतातील विधायी प्रतिनिधित्वाच्या क्षेत्रात लैंगिक असमानतेची संरचनात्मक परिस्थिती प्रतिबिंबित करतात. असोसिएशन ऑफ डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स (ADR) आणि नॅशनल इलेक्शन वॉच (NEW) यांनी त्यांच्या 2020 च्या अभ्यासात असे निरीक्षण नोंदवले आहे की "केंद्रीय आणि राज्यांच्या निवडणुका लढवणाऱ्या 50,000 उमेदवारांपैकी दहापेक्षा कमी उमेदवार महिला आहेत." भारतातील महिला मंत्र्यांची संख्याही कालांतराने वाढली आहे, परंतु पुरुष मंत्र्यांच्या तुलनेत हे प्रमाण खूपच कमी आहे.

**महिला राजकीय अधिकारांबद्दल जागरूक**

तिसऱ्या स्तरावरील स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी, म्हणजे पंचायत आणि नगरपालिकांमध्ये, 1992 मधील 73 व्या आणि 74 व्या दुरुस्ती कायद्याच्या संमताने या संस्थांमध्ये महिलांसाठी एकूण जागांपैकी एक तृतीयांश जागा राखून ठेवण्याची तरतूद केली आहे. अभ्यासांनी असे सुचवले आहे की महिलांसाठी जागा राखीव ठेवण्याच्या धोरणामुळे स्थानिक पातळीवरील शासकीय संस्थांमध्ये,महिलांच्या राजकीय सहभागामध्ये अभूतपूर्व वाढ झाली आहे. जरी 'महिलांचे प्रॉक्सी प्रतिनिधित्व' बाबत सुरुवातीच्या काळात चिंता होती, परंतु कालांतराने महिला प्रतिनिधी त्यांच्या राजकीय अधिकारांबद्दल अधिक जागरूक झाल्या आहेत आणि शासनाच्या अनुभवांशी परिचित झाल्या आहेत, ज्यामुळे त्यांना भारतातील तळागाळातील राजकीय निर्णय घेण्याचे खरे प्रतिनिधी बनले आहे.राजकारण आणि प्रशासनाच्या संस्थांमध्ये महिलांचे वर्णनात्मक तसेच ठोस प्रतिनिधित्व सुनिश्चित करणारा भारतीय लोकशाहीतील सहभाग ही काळाची गरज आहे.

**राजकीय क्रांतिचे भवितव्य**

१९९२-९३ मध्ये ७३ व्या आणि ७४ व्या घटनादुरुस्तीनंतर पंचायतराजमध्ये स्त्रियांना मिळालेल्या ३३ टक्के आणि पुढे ५० टक्के आरक्षणामुळे लाखो स्त्रिया सक्रिय राजकारणात उतरू शकल्या आहेत.(आणि त्यात दलित,आदिवासी,आणि इतर मागासवर्गीय (ओबीसी) स्त्रियांसाठी पोट आरक्षण असलेल्या जागा आरक्षित केल्यानंतर एक प्रकारे राजकीय क्रांतीच घडून आली. पुरुषसत्ताक मानसिकतेतून साकारणाऱ्या स्त्रियांचे चारित्र्यहनन,धमक्या त्यांच्यावरील हल्ले वगैरे अनिष्ट कृतींशी संघर्ष करत राजकारणातील या स्त्रिया लोकहिताचं काम करत स्त्री प्रश्नाला भिडण्याचा प्रयत्न सुद्धा काही ठिकाणी करत आहेत. सध्या लोकसभेत १४ टक्के तर देशातील विधानसभांमध्ये ८ टक्के इतकेच महिलांचे प्रमाण आहे.७५ वर्षांचा वारसा असलेल्या भारतीय लोकशाहीला हे भूषणावह नाही.येऊ घातलेल्या नारीशक्ती वंदन विधेयकातील आरक्षणामुळे ते प्रमाण स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षणाप्रमाणेच क्रांतिकारी ठरेल. महिला आमदार,खासदारांची संख्या वाढल्याने महिलांच्या स्थितीत सुधारणा होईलच,असे नाही. मात्र तरीही आपण हे पाऊल साजरे केले पाहिजे कारण महिलांचे प्रतिनिधित्व वाढल्यामुळे महिलाविरोधी धोरणे आखणे नक्कीच कठीण होईल. आजवर उपेक्षित असलेल्या निम्म्या लोकसंख्येची दखल घेतली गेली आहे,या बाजूलाही स्वत:चा आवाज आहे आणि तो ऐकावाच लागेल,हे भवितव्य ठामपणे अधोरेखित झाले आहे.

**निष्कर्ष**

भारतीय राजकारण पूर्णपणे पुरुषप्रधान आहे.त्यामुळे स्त्रियांना आपल्या बाजूने कायदे आणि धोरणे करून घेण्यासाठी नेहमीच दीर्घ काळ लढा द्यावा लागला हे ऐतिहासिक सत्य आहे.स्त्रिया आणि राजकारण


Copyright © | JET Network, All Rights Reserved

हा प्रश्न आरक्षणात गुंतवून ठेऊन स्त्रियांना इतर विचारांपासून दूर ठेवण्याचा पुरुषी डाव हाणून पाडण्याचं आव्हान समोर आहे. सर्व निर्णय प्रक्रियेत सहभाग मिळविण्यासाठी व्यापक राजकारणाच्या आखाड्यात पाय रोवून उद्याच्या प्रश्नना सामोरे जाव लागणार आहे.

**संदर्भ**

१. नागगोंडे गुरुनाथ,सामाजिक आंदोलने,कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे,प्रथमावृत्ती,१९८६
२. भोळे,भा.ल.,भारताचे शासन व राजकारण,पिंपळापुरे प्रकाशन,नागपूर
३. देशमुख अलका,स्थानिक स्वशासन,साईनाथ प्रकाशन,धरमपेठ नागपूर, प्रथमावृत्ती २०१३
४. जावडेकर शरद,जोशी वसुधा,जाधव लता,म्हसदे रवींद्र,सामाजिक परिवर्तन: चिकित्सा आणि भवितव्य,सुगावा प्रकाशन, प्रथमावृत्ती २००९
५. साप्ताहिक साधना,३० सप्टेंबर २०२३

**वृत्तपत्रे**

१. संपादकीय,लोकसत्ता,दि. २३ सप्टेंबर २०२३
२. चतुरंग,लोकसत्ता,दि. ३० सप्टेंबर २०२३
३. संपादकीय,लोकसत्ता,दि. २२ सप्टेंबर २०२३
४. लोकसत्ता,दि. २१ सप्टेंबर २०२३

**वेबसाईटच्या माध्यमातून वेळोवेळी प्रसिद्ध होणारे लेख**

१. पाटील शीतल,कधी येणार लैंगिक समानता?
२. घोष अंबरकुमार,लोकशाही राजकारणात महिलांचा सहभाग वाढावा,१६ सप्टेंबर २०२२
३. लैंगिक समानतेचे वास्तव,३० नोव्हेंबर २०२२


Copyright © | JET Network, All Rights Reserved